# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of missing Child**

**Police Station** :- **Washim**

**Date of Good Work done** :- **20/09/2022**

**Brief of the work done :-**

नऊ वर्षांपासून अपहृत मुलीचा शिर्डी येथे लागला शोध ; वर्षभरात पळविलेल्या 46 मुली पालकांच्या ताब्यात.

लोकमत

आरोपीस अटक : मुलीला केले पालकांच्या स्वाधीन

## नऊ वर्षांपासून अपहृत मुलीचा शिर्डी येथे लागला शोध

**वाशिम** : ग्रामीण पोलिसांत २०१४ मध्ये दाखल गुन्ह्यातील अपहृत मुलीचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले आहे. पीडित मुलीला ताब्यात घेऊन पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. प्राप्त माहितीनुसार, २०१४ मध्ये वामन फकिरा महाले (कळंबा महाली) यांनी वाशिम ग्रामीण पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यांच्या अल्पवयीन मुलीला गावातीलच पांडुरंग महाले याने पळवून नेल्याचे तक्रारीत नमूद होते. तेव्हापासून पोलीस आरोपीच्या व मुलीच्या शोधात होते. दरम्यान, पीडित मुलगी शिर्डी येथे असल्याचे कळताच, पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन मुलगी व आरोपीला ताब्यात घेऊन पालकांच्या स्वाधीन केले.

### जिल्ह्यातील ८ बालकांचा लागला शोध

जिल्ह्यातील वाशिम शहर पोलिसांत दाखल गुन्ह्यातील १, मालेगाव पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील ३, मानोरा येथील १, जउळका पोलिसांत दाखल गुन्ह्यातील १ आणि कारंजा ग्रामीण ठाण्यात दाखल गुन्ह्यातील एका अपहृत बालकाचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले.

### पळविलेल्या ४६ मुली घेतल्या ताब्यात

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने चालू वर्षात जानेवारी महिन्यापासून जिल्ह्यातून पळविलेल्या ५४ मुलींपैकी ४६ मुलींचा शोध लावण्यात यश मिळविले. पळविलेल्या ३ मुलांपैकी २ मुलांना ताब्यात घेण्यात आले.

जिल्ह्यात गुन्हेगारीला आळा बसण्यासाठी व महिला, मुलींच्या सुरक्षेसाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. निर्भया पथकाकडून गरजूंना वेळेत मदत उपलब्ध करून दिली जात आहे. हरविलेल्या व पळविलेल्या महिला, मुलींचा शोध घेण्याकरिता अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.

\- बच्चन सिंह, जिल्हा पोलीस अधीक्षक, वाशिम.